29 NOV 2017 सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# भिलारसारखी गावे प्रत्येक जिल्ह्यात तयार व्हावीत

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे : विद्यापीठातर्फे पुस्तकांच्या गावाला ५१७ ग्रंथ भेट



भिलार गावाला ५१७ ग्रंथाची मिळालेली भेट कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्याकडून स्वीकारताना ग्रंथालयाचे संचालक किरण धांडोरे. शेजारी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर आदी.

कोल्हापूर, ता. २८ : देशातील वाचन संस्कृती वृद्धिंगत होण्याच्या दृष्टीने भिलारसारखी पुस्तकांची गावे जिल्ह्याजिल्ह्यांत निर्माण व्हायला हवीत, अशी अपेक्षा शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी भिलार (जि. सातारा) येथे व्यक्त केली.

देशातील पहिले पुस्तकांचे गाव म्हणून राज्य शासनाने विकसित केलेल्या भिलारला शिवाजी विद्यापीठातर्फे ५१७ पुस्तके प्रदान करण्यात आली. सातारा जिल्हा ग्रंथालय संघाचे ४५ वे अधिवेशन, मातृ-पितृ पुरस्कार वितरण आणि स्वातंत्र्यसैनिक देशभक्त भि.दा. भिलारे गुरूजी यांची ९८ वी जयंती अशा संयुक्त समारंभाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते.

राज्य ग्रंथालय संचालक किरण धांडोरे यांनी भिलारच्यावतीने कुलगुरूंच्या हस्ते ग्रंथभेट स्वीकारली. या वेळी उद्योजक सारंग श्रीनिवास पाटील, ज्येष्ठ साहित्यिक प्रा. द. ता. भोसले, जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष संभाजीराव पाटणे, विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड, उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, प्राचार्य डॉ. डी.आर. मोरे, प्राचार्य डॉ. आर. एस. पाटील, प्राचार्य डॉ. दिलीप कुरळपकर, प्राचार्य डॉ. बी.एस. सावंत उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, वाचनसंस्कृती जोपासण्यासाठी व वृद्धिंगत करण्यासाठी भिलार येथे राबविलेला पुस्तकांचे गाव हा प्रकल्प स्तुत्य व ऐतिहासिक स्वरूपाचा आहे. त्यासाठी योगदान देणाऱ्या ग्रामस्थांचा उत्साह अवर्णनीय आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून पुस्तकांमधील ज्ञान व त्यांची उपलब्धता या दृष्टीने एक नवा आयाम स्थापित होत आहे. विद्यापीठातर्फे सध्या प्रातिनिधिक स्वरुपात पुस्तकांची देणगी देत असून या पुढील काळातही या उपक्रमामध्ये विद्यापीठ सर्वतोपरी सहकार्य राहील.

### नागरबाई शिंदेंचा पुरस्काराने गौरव

स्वतः अल्पशिक्षित असूनही आपल्या मुलाला मोठ्या संघर्षातून जिद्दीने शिकवून कुलगुरू पदापर्यंत पोचविणाऱ्या श्रीमती नागरबाई शिंदे यांचा या कार्यक्रमात संभाजीराव पाटणे यांच्या हस्ते मातृ-पितृ पुरस्कार प्रदान करून गौरव करण्यात आला. या प्रसंगी त्यांचे सुपुत्र कुलगुरू डॉ. शिंदे व स्नुषा सौ. अनिता यांच्यासह शिंदे परिवारातील सदस्य उपस्थित होते.

29 NOV 2017
महाराष्ट्र टाईम्स
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'भिलारसारखी पुस्तकांची गावे निर्माण व्हावीत'

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

'वाचनसंस्कृती जोपासण्यासाठी व वृद्धिंगत करण्यासाठी भिलार येथे राबविलेला पुस्तकांचे गाव हा प्रकल्प स्तुत्य व ऐतिहासिक स्वरुपाचा असून त्यासाठी योगदान देणाऱ्या ग्रामस्थांचा उत्साह अवर्णनीय आहे. भिलारसारखी पुस्तकांची गावे जिल्ह्या-जिल्ह्यांत निर्माण व्हायला हवीत. उपक्रमाला शिवाजी विद्यापीठ सर्वतोपरी सहकार्य करेल,' अशी ग्वाही कुलगुरू डॉ. शिंदे यांनी या प्रसंगी दिली.

शिंदे यांनी भिलार (जि. सातारा) येथे व्यक्त केली. देशातील पहिले पुस्तकांचे गाव म्हणून महाराष्ट्र सरकारने विकसित केलेल्या भिलारला शिवाजी विद्यापीठाच्या वतीने ५१७ पुस्तके प्रदान करण्यात आली.



**शिवाजी विद्यापीठातर्फे भिलार गावाला कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते ५१७ ग्रंथांची भेट देण्यात आली. ती स्वीकारताना ग्रंथालय संचालक किरण धांडोरे. शेजारी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर आदी.**

सातारा जिल्हा ग्रंथालय संघाचे ४५ वे अधिवेशन, मातृ-पितृ पुरस्कार वितरण आणि स्वातंत्र्यसैनिक देशभक्त भि. दा. भिलारे गुरुजी यांची ९८वी जयंती अशा संयुक्त समारंभाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते. यावेळी विद्यापीठाच्या वतीने हा पुस्तक प्रदान सोहळा पार पडला.

महाराष्ट्र राज्याचे ग्रंथालय संचालक किरण धांडोरे यांनी भिलारच्या वतीने कुलगुरूंच्या हस्ते ग्रंथभेट स्वीकारली. यावेळी उद्योजक सारंग श्रीनिवास पाटील, ज्येष्ठ साहित्यिक प्रा. द. ता. भोसले, जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष संभाजीराव पाटणे, विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. डी.के. गायकवाड, उपकुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे आदी उपस्थित होते.

विद्यापीठातर्फे प्रातिनिधिक स्वरुपात ५१७ पुस्तके देण्यात आली. या पुस्तकांमध्ये विद्यापीठातर्फे प्रकाशित केलेल्या महत्त्वाच्या पुस्तकांबरोबरच विद्यापीठातील शिक्षक, अधिकारी, प्राचार्य यांनीही काही पुस्तके भेट स्वरुपात दिली.

29 NOV 2017

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संविधानाचा नियमित अभ्यासक्रमात समावेश व्हावा

## परिसंवादातील सूर : शिवाजी विद्यापीठात संविधान दिनानिमित्त कार्यक्रम

कोल्हापूर, ता. २८ : भारतीय संविधानाविषयी नागरिकांत जास्तीत जास्त जागृती करण्याची गरज असून संविधानाचा नियमित अभ्यासक्रमात समावेश करणे आवश्यक आहे, असा सूर शिवाजी विद्यापीठात आज झालेल्या परिसंवादात व्यक्त झाला.

भारतीय संविधान दिनानिमित्त विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्रातर्फे भारतीय संविधान आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर या विषयावर परिसंवादाचे आयोजन करण्यात आले. परिसंवादात डॉ. रविनंद होवाळ (सोलापूर), प्रा. सुभाष दगडे (सांगली), डॉ. राजेंद्र कुंभार (सातारा) यांनी सहभाग घेतला. अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

डॉ. राजेंद्र कुंभार म्हणाले, "भारताचा अर्धा प्रवास एक व्यक्ती, एक मत इतकाच झाला आहे. अद्याप एक मत, एक मूल्य हा प्रवास पूर्ण करून क्रांतीच्या चक्रास पूर्णत्व प्रदान करावयाचे आहे. माहीतगार आणि नीतिमान लोकांचा समूहच देशाला खऱ्या लोकशाहीपर्यंत घेऊन जाईल. त्या दृष्टीने अभ्यासक्रमात विद्यार्थ्यांना केवळ साक्षर होण्याचे नव्हे, तर मनुष्य होण्याचे शिक्षण देण्याची गरज आहे. प्रा. सुभाष दगडे यांनी संविधानात विषमतेला थारा नाही. अशा व्यवस्थेला प्रोत्साहनाचे प्रयत्न नाकारून सामाजिक-आर्थिक न्यायाच्या प्रस्थापनेसाठी प्रयत्न करण्यासाठी चळवळींचे पुनरुज्जीवन करण्याची गरजही व्यक्त केली. डॉ. रविनंद होवाळ यांनी भारतीय संविधानाची विविध वैशिष्ट्ये, पैलू आणि त्याच्या निर्मितीमध्ये डॉ. आंबेडकर यांच्या योगदानाचा सविस्तर ऊहापोह केला.



**कोल्हापूर : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस अभिवादनप्रसंगी डॉ. एस. एस. महाजन, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. राजेंद्र कुंभार, प्रा. सुभाष दगडे व डॉ. रविनंद होवाळ.**

अध्यक्षीय भाषणात प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी संविधानाच्या संदर्भात विद्यार्थ्यांत जागृती घडविण्याची आणि सामाजिक प्रबोधन करण्याची जबाबदारी शिक्षण क्षेत्राची असून हे कर्तव्य पार पाडण्यासाठी सकारात्मक प्रयत्न करण्याची गरज व्यक्त केली. मान्यवरांच्या हस्ते संविधानाची प्रत उघडून परिसंवादाचे उद्घाटन करण्यात आले. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले. या वेळी विधी सेवा प्राधिकरणाचा ब्रँड ॲम्बॅसिडर असलेल्या पाच वर्षांच्या रेहान शकील नदाफ या बालकाने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जीवनपट उपस्थितांसमोर उलगडला. डॉ. आंबेडकर केंद्राचे संचालक डॉ. एस. एस. महाजन यांनी स्वागत केले. तेजपाल मोरे यांनी आभार मानले.

29 NOV 2017

लोकसत्ता

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ‘संविधानाचा नियमित अभ्यासक्रमात समावेश करणे आवश्यक’

**प्रतिनिधी, कोल्हापूर**

**भारतीय संविधानाविषयी** नागरिकांत जास्तीतजास्त जागृती करण्याची गरज असून, संविधानाचा नियमित अभ्यासक्रमात समावेश करणे आवश्यक आहे, असा सूर शिवाजी विद्यापीठात आज झालेल्या परिसंवादात व्यक्त झाला.

भारतीय संविधानदिनानिमित्त विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राच्या वतीने ‘भारतीय संविधान आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर’ या विषयावर विशेष परिसंवादाचे आयोजन करण्यात आले. परिसंवादात डॉ. रविनंद होवाळ (सोलापूर), प्रा. सुभाष दगडे (सांगली) आणि डॉ. राजेंद्र कुंभार (सातारा) यांनी सहभाग घेतला. अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्रकुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

डॉ. कुंभार यांनी बाबासाहेबांच्या ‘क्रांतीचे चक्र अर्धेच फिरले आहे’ या विधानाचा संदर्भ दिला आणि म्हणाले, की भारताचा हा अर्धा प्रवास ‘एक व्यक्ती, एक मत’ इतकाच झाला आहे. अद्याप ‘एक मत, एक मूल्य’ हा प्रवास पूर्ण करून क्रांतीच्या चक्रास पूर्णत्व प्रदान करावयाचे आहे. सामाजिक समता ही आपोआप प्रस्थापित होणारी बाब नसून, त्यासाठी शिक्षणाची पुनर्मांडणी करण्याची गरज असून नीतिमानतेचे प्रशिक्षण देणेही आवश्यक आहे.

प्रा. दगडे यांनी संविधानास अभिप्रेत असणारे लोककल्याणकारी राज्य आणि शिक्षणव्यवस्थेमधील सुधारणा या दृष्टीने अत्यंत चिंतनपर मांडणी केली. ते म्हणाले, संविधानात विषमतेला थारा नाही. अशा व्यवस्थेला प्रोत्साहनाचे प्रयत्न नाकारून सामाजिक-आर्थिक न्यायाच्या प्रस्थापनेसाठी प्रयत्न करण्यासाठी चळवळींचे पुनरुज्जीवन करण्याची गरजही त्यांनी प्रतिपादन केली.

डॉ. होवाळ यांनी भारतीय संविधानाची विविध वैशिष्ट्ये, पैलू आणि त्याच्या निर्मितीमध्ये डॉ. आंबेडकर यांच्या योगदानाचा सविस्तर ऊहापोह केला. ते म्हणाले, स्वातंत्र्यप्राप्तीनंतर गेल्या ७० वर्षांच्या वाटचालीत आपण आता कुठे संविधानाच्या प्रास्ताविकेपर्यंत पोहोचलो आहोत. अद्याप बराच पल्ला आपल्याला गाठावयाचा आहे.

संविधानाची प्रत उघडून परिसंवादाचे प्रतीकात्मक उद्घाटन करण्यात आले. पाच वर्षांच्या रेहान शकील नदाफने डॉ. आंबेडकर यांचा जीवनपट उपस्थितांसमोर उलगडला. केंद्राचे संचालक डॉ. एस. एस. महाजन यांनी प्रास्ताविक केले. तेजपाल मोरे यांनी आभार मानले.

## संविधान दूत योजना अमलात

**प्रकुलगुरू शिर्के म्हणाले, शिवाजी विद्यापीठाने संविधान दूत ही योजना आजपासून अमलात आणली असून, त्याअंतर्गत महाविद्यालयांकडून त्यांची नियुक्ती झाल्यानंतर विद्यापीठ स्तरावर संविधान दूतांना सविस्तर प्रशिक्षण देण्यात येईल.**

2 9 NOV 2017 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# व्यवस्थापन परिषद निवड प्रक्रिया मुदतीत वाढ

## २८ फेब्रुवारीपर्यंत वाढली मुदत

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाची निवडणूक नुकतीच झाली. या निवडणूक प्रक्रियेचाच भाग म्हणून राज्यपाल नियुक्त आणि कुलगुरू नियुक्त सदस्यांची निवड केली जाणार आहे. तसेच सिनेट, विद्या परिषद, अभ्यासमंडळे या सर्वांचे प्रतिनिधित्व असणारे व्यवस्थापन परिषद यातून तयार केले जाते. या सर्व निवड प्रक्रियेची मुदत २८ फेब्रुवारी २०१८ पर्यंत वाढवण्यात आली आहे. यापूर्वी नोव्हेंबरअखेर मुदत होती.

शिवाजी विद्यापीठाची निवडणूक १७ नोव्हेंबरला झाली. निवडणुकीनंतर राज्यपाल आणि कुलगुरू नियुक्त सदस्यांबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे. नव्या विद्यापीठ कायद्यानुसार नियुक्त सदस्यांची संख्या ही निवडून आलेल्यांपेक्षा जास्त आहे. त्यामुळे या नियुक्तींकडे शिक्षण क्षेत्राचे लक्ष लागून राहिले आहे. यापूर्वी राज्यपाल नियुक्त दोन सदस्यांची नावे जाहीर झाली आहेत. पण अजूनही मोठ्या प्रमाणावर नियुक्ती बाकी आहेत. तसेच धोरणे निश्चित करण्यासाठी महत्त्वाचे मानले जाणारे व्यवस्थापन परिषद (मॅनेजमेंट कौन्सिल) अद्याप निर्माण झालेले नाही. निवडून आलेल्या सदस्यांचे प्रतिनिधी म्हणून व्यवस्थापन परिषद ही संस्था काम करत असल्याने तिला शैक्षणिक वर्तुळात मानाचे स्थान आहे. आता या सर्व प्रक्रियेसाठी मुदतवाढ मिळाली आहे.



शिवाजी विद्यापीठातून

2 9 NOV 2017

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# खो-खो मध्ये शिवाजी विद्यापीठाची बाजी

## 'अश्वमेध क्रीडा स्पर्धा २०१७' साठी दापोलीत २० विद्यापीठांचे खेळाडू सहभागी

**कोल्हापूर/दापोली : प्रतिनिधी**

दापोली येथील डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाच्या विजय क्रीडा संकुलावर दि. २७ नोव्हेंबरपासून सुरू झालेल्या २१ व्या राज्यस्तरीय अश्वमेध या आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राच्या २० विद्यापीठांतील क्रीडापटूंनी सहभाग घेतला आहे. सोमवारपासून सुरू झालेल्या स्पर्धेत **खो-खो पुरुषांच्या गटा** मध्ये शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरने परभरणीच्या वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचा एक डाव आणि १२ गुणांनी दणदणीत पराभव केला.

या स्पर्धा १ डिसेंबरपर्यंत सुरु राहणार असून त्याच दिवशी बक्षीस वितरण होणार आहे. सोमवारपासून सुरु झालेल्या विविध क्रीडा प्रकारांचा निकाल असा : **खो -खो (पुरुष)** १) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर वि. वि. वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी २) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक वि. वि. महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी३) उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगावने वि. वि. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक ४) स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेडवि.वि.डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद ५) स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड वि. वि. डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ, लोणेरे ६) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे वि. वि. गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली ७) मुंबई विद्यापीठ वि. वि. डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला

**खो खो (पुरुष) :१)** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर वि. वि. सोलापूर विद्यापीठ, सोलापूर २) संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती वि. वि. वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी ३) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक वि. वि. गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली ४) उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव वि. वि. डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
29 NOV 2017
Times of India

# 'NBA evaluation must for colleges'

State Directorate of Technical Education (DTE) has once again reminded government, aided and private institutions offering professional courses to seek certification from the National Board of Accreditation (NBA) before the stipulated deadline of 2018-19.

The directorate has also reminded colleges that no reimbursement towards welfare scheme of students would be permitted if necessary evaluation is not done in time. The regional offices of DTE have been asked to compile data of NBA status of colleges. TNN

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

29 NOV 2017 मुक्तनायक

# अर्थशास्त्र विभागात संविधान दिन उत्साहाने साजरा



कोल्हापूर- अर्थशास्त्र विभाग शिवाजी विद्यापीठ येथे गेल्या रविवारी संविधान दिन उत्साहाने साजरा करण्यात आला. अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. पी. एस, कांबळे यांनी डॉ. बाबासाहेब यांच्या प्रतिमेला पुष्पहार घातला. या प्रसंगी सविंधान पुजन हि करण्यात आले. तसेच डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेला आणि सविंधानाला पुष्पवहन हि करण्यात आले. या वेळी सविंधानातील उदेशिका वाचन करण्यात आले आणि उपस्थितीना शपथ हि देण्यात आली. या प्रसंगी अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ.पी. एस, कांबळे,प्रा. डॉ. ए. म. गुरव, प्रा. डॉ. डी. सी. तलुले, प्रा. डॉ. एम. एस. देशमुख, एस, टी. कोंबडे , प्रशाकीय सेवक , विद्यार्थी मोठ्या संखेने हजार होते. हा उपक्रम पुढच्या वर्षी वेगवेगळ्या कार्यक्रमातून मोठ्या प्रमाणावर साजरा करण्याचे ठरले.

2 9 NOV 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

मुक्तनायक

# भारतीय संविधानाचा नियमित अभ्यासक्रमात समावेश आवश्यक

कोल्हापूर, दि. नोव्हेंबर: भारतीय संविधानाविषयी नागरिकांत जास्तीत जास्त जागृती करण्याची गरज असून संविधानाचा नियमित अभ्यासक्रमात समावेश करणे आवश्यक आहे, असा सूर शिवाजी विद्यापीठात आज झालेल्या परिसंवादात व्यक्त झाला.

भारतीय संविधान दिनानिमित्त विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राच्या वतीने भारतीय संविधान आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर या विषयावर विशेष परिसंवादाचे आयोजन करण्यात आले. परिसंवादात डॉ. रविनंद होवाळ (सोलापूर), प्रा. सुभाष दगडे (सांगली) आणि डॉ. राजेंद्र कुंभार (सातारा) यांनी सहभाग घेतला. अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के होते.

या प्रसंगी बोलताना डॉ. राजेंद्र कुंभार यांनी बाबासाहेबांच्या क्रांतीचे चक्र अर्धेच फिरले आहे, या विधानाचा संदर्भ दिला आणि म्हणाले की, भारताचा हा अर्धा प्रवास एक व्यक्ती. एक मत इतकाच झाला आहे. अद्याप एक मत, एक मूल्य हा प्रवास पूर्ण करून क्रांतीच्या चक्रास पूर्णत्व प्रदान करावयाचे आहे. माहीतगार आणि नीतिमान लोकांचा समूहच देशाला खऱ्या लोकशाहीपर्यंत घेऊन जाईल. त्या दृष्टीने अभ्यासक्रमात विद्यार्थ्यांना केवळ साक्षर होण्याचे नव्हे, तर मनुष्य होण्याचे शिक्षण देण्याची गरज आहे. सामाजिक समता ही आपोआप प्रस्थापित होणारी बाब नसून त्यासाठी शिक्षणाची पुनर्मांडणी करण्याची गरज असून नीतिमानतेचे प्रशिक्षण देणेही आवश्यक आहे. त्यासाठी महात्मा फुले, एम.एन. रॉय आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सत्य हे मूल्य मानणाऱ्या विचारसरणीचा अभ्यासात समावेश आवश्यक आहे. राजकीय स्वातंत्र्यापेक्षा सामाजिक व आर्थिक स्वातंत्र्य व समता प्राप्त करण्यासाठी संघर्ष अटळ आहे. त्यासाठी सर्वच स्तरांवरील शिक्षण मोफत करण्याची गरज असून ज्ञानाची ऊर्जाकेंद्रे असलेल्या विद्यापीठांनी त्यासाठी प्रयत्न करण्याची गरजही त्यांनी व्यक्त केली.



डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस अभिवादन केल्यानंतर (डावीकडून) डॉ. एस.एस. महाजन, प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, डॉ. राजेंद्र कुंभार, प्रा. सुभाष दगडे व डॉ. रविनंद होवाळ.

प्रा. सुभाष दगडे यांनी संविधानास अभिप्रेत असणारे लोककल्याणकारी राज्य आणि शिक्षणव्यवस्थेमधील सुधारणा या दृष्टीने अत्यंत चिंतनपर मांडणी केली. ते म्हणाले, बाबासाहेबांनी भारतातील विषमतावादी समाजरचनेचा सर्वंकष अभ्यास करून त्यावर उपाय म्हणून सामाजिक, नैसर्गिक मूल्यांवर आधारित संविधान देण्याचा प्रयत्न केला. येथे पूर्वापार बसलेल्या धर्मसंसदेपेक्षा लोकसंसद प्रभावी ठरली पाहिजे, लोकांना आवाज प्राप्त झाला पाहिजे, असा आग्रह त्यामागे होता. या पार्श्वभूमीवर बुद्धीप्रामाण्यवादी, लोकशाहीवादी दृष्टीकोन निर्माण करण्याची जबाबदारी धोरणकर्त्यांवर आहे. त्याचप्रमाणे आजची शिक्षणव्यवस्था अधिकाधिक विज्ञानवादी व प्रगल्भ होण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. बाबासाहेबांनी म्हटल्याप्रमाणे जंगल, जमीन आणि जल या नैसर्गिक साधनसंपत्तीचा विकास, संवर्धन व वाटप यांचे योग्य नियोजन करण्याची गरज आहे. संविधानात विषमतेला थारा नाही. अशा व्यवस्थेला प्रोत्साहनाचे प्रयत्न नाकारून सामाजिक-आर्थिक न्यायाच्या प्रस्थापनेसाठी प्रयत्न करण्यासाठी चळवळींचे पुनरुज्जीवन करण्याची गरजही त्यांनी प्रतिपादन केली.

डॉ. रविनंद होवाळ यांनी भारतीय संविधानाची विविध वैशिष्ट्ये, पैलू आणि त्याच्या निर्मितीमध्ये डॉ. आंबेडकर यांच्या योगदानाचा सविस्तर ऊहापोह केला. ते म्हणाले, स्वातंत्र्यप्राप्तीनंतर गेल्या वर्षांच्या वाटचालीत आपण आता कुठे संविधानाच्या प्रास्ताविकेपर्यंत पोहोचलो आहोत. अद्याप बराच पल्ला आपल्याला गाठावयाचा आहे. डॉ. आंबेडकर यांनी संविधानात प्रत्येक शब्द अत्यंत अभ्यासपूर्वक

(पान ४ वर)

2 9 NOV 2017

मुक्तनायक

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

पान ३ वर

## संविधानाचा...

व चिकित्सकपणे योजला आहे. घटना राबविणारे हात चांगले असतील, तर तिची चांगली फळे मिळतील, अन्यथा हे चांगले हात निर्माण करण्याची जबाबदारी समाजाची आहे, याची जाणीव बाबासाहेबांनी करून दिलेली होती. भारतात विषमतेचे मूळ असणाऱ्या जाती विसर्जित केल्याखेरीज आपण कधीही एक राष्ट्र बनू शकणार नाही, असा इशाराही त्यांनी देऊन ठेवला आहे. त्यामुळे आजघडीला या देशातल्या प्रत्येक नागरिकाने देशहिताला सर्वोच्च प्राधान्य देत अंगी राष्ट्रीय वृत्ती बाणवण्याची गरज आहे, असे मत डॉ. होवाळ यांनी व्यक्त केले.

अध्यक्षीय भाषणात प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांनी संविधानाच्या संदर्भात विद्यार्थ्यांत जागृती घडविण्याची आणि सामाजिक प्रबोधन करण्याची जबाबदारी शिक्षण क्षेत्राची असून हे कर्तव्य पार पाडण्यासाठी सकारात्मक प्रयत्न करण्याची गरज व्यक्त केली. ते म्हणाले, शिवाजी विद्यापीठाने संविधान दूत ही योजना आजपासून अंमलात आणली असून त्याअंतर्गत महाविद्यालयांकडून त्यांची नियुक्ती झाल्यानंतर विद्यापीठ स्तरावर संविधान दूतांना सविस्तर प्रशिक्षण देण्यात येईल. संविधान जागृतीसाठी करावयाच्या उपक्रमांचे धोरण आखून त्यानुसार प्रत्येक संबंधित घटकापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करण्यासाठी त्यांना प्रोत्साहित करण्यात येईल.

कार्यक्रमाच्या सुरवातीला मान्यवरांच्या हस्ते संविधानाची प्रत उघडून परिसंवादाचे प्रतिकात्मक उद्घाटन करण्यात आले. तसेच, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले. यावेळी विधी सेवा प्राधिकरणाचा ब्रँड अँम्बॅसिडर असलेल्या पाच वर्षांच्या रेहान शकील नदाफ या बालकाने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जीवनपट उपस्थितांसमोर उलगडला. डॉ. आंबेडकर केंद्राचे संचालक डॉ. एस.एस. महाजन यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. तेजपाल मोरे यांनी आभार मानले.